# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३६५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२९/०६/२०१६.

**१) बेदरकारपने मोटार सायकल चालविल्याने अपघात होवुन दोघांचा मृत्यु. :—**

दिनांक २७/०६/०१६ रोजी १९.४५ वा. दरम्यान आरोपी याने त्याच्या ताब्यातील बजाज पल्सर बिना नंबरच्या मोटार सायकल वर भाष्कर आनंदराव टेंभरे वय ३२ वर्ष, रा. हिंगणा याला मागे बसवुन चुल्हाड वरून तुमसर कडे येत असतांना आरोपी याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन तुमसर ते डांबरी रोड खैरलांजी शिवार येथील आंब्याच्या झाडाला धडक मारून स्वत: व मागे बसलेल्या इसमाच्या मरणास कारणीभुत झाला. असे फिर्यादी डॉ. प्रिती आनंदराव टेंभरे वय ३० वर्ष, रा. हिंगणा तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. हावरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत इसम जखमी. :—**

दिनांक २७/०६/०१६ रोजी १९.४५ वा. दरम्यान फिर्यादी कपील पुनमचंद बोदेले वय ३४ वर्ष, रा. खोकरला हे त्यांच्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ६२७८ ने आपल्या बाजुने जात असतांना समोरुन विरुध्द दिशेने येणा—या यामाहा झेड मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ७९९१ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन मंगलमुर्ती कार्यालय खात रोड भंडारा येथे फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुण पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादंवी सहकलम १८४,३/१८१ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २८/०६/०१६ रोजी १८.०० ते १८.३० वा. दरम्यान टाटा सुमो क्र. एमएच ३१ टीएम २४९७ च्या आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निलज फाटा येथे आमरोडवर लोकांच्या जिवीतास धोका पोहचेल व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करतांना मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) विषारी औषध प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु. :-

दिनांक २८/०६/०१६ रोजी १८.३० वा. दरम्यान कैलास गोविंदा ऊके वय ४५ वर्ष, रा. गुरढा याने विषारी औषध प्राशन केल्यामुळे त्यांना औषधोपचारा करीता ग्रा.रू. पालांदुर येथे आनले होते, परंतु त्यांना डॉ. ने तपासुन मृत घोषीत केले. डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :-

दिनांक २८/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा-यांवर ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व इतर वाहनांवरती १२० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.